# सातारा जिल्हा परिषद
## अर्थ विभाग

**पत्ता-जिल्हा परिषद,इमारत,सातारा** **दूरध्वनी/फॅक्स** – 02162/233832
**सातारा पिन कोड नं.**415 001 E-mail- cafozpsatara@gmail.com


जा.क्र.अर्थ /भांडार/अभिलेख कक्ष रॅक/ /2025, दिनांक / 01/2025

**दरपत्रके मागणी पत्र**

**प्रति.**
1…………………
2…………………
3………………….
4.**नोटीस बोर्डवर प्रसिध्द**

**विषय :- अर्थ विभागाकडील अभिलेख कक्ष/भांडार कक्षात नवीन लोखंडी शिड्या (Steel Rack) बसविणे मजुरीसह इत्यादी चे दरपत्रक सादर करणेबाबत**

उपरोक्त विषयी कळविणेत येते की, अर्थ विभाग, जिल्हा परिषद सातारा, हे कार्यालय कार्यालयीन कामकाजाच्या दृष्टीने कार्यालयातील अभिलेख कक्षामध्ये आवश्यक नवीन लोखंडी शिड्या (RACK) बसविण्याच्या मजुरीसह होणाऱ्या कामाचे दरपत्रक मागवित आहे.

1. जे कोणी पुरवठादार खालील प्रमाणे कामकाज करणेस इच्छूक असतील त्यांनी आपले दरपत्रक सीलबंद लखोटयातून खाली सही करणार यांचे नावे दिनांक 30.01.2025 ते दिनांक 06.02.2025 पर्यंत कार्यालयीन वेळेत अर्थ विभाग,जि.प.सातारा कार्यालयात समक्ष अथवा पोस्टाने पोहोच होतील अशा बेताने पाठवावे. उपरोक्त दरपत्रके विहीत दिनांकास अथवा तत्पुर्वी या कार्यालयास प्राप्त न झाल्यास ती स्विकारली जाणार नाहीत. विहीत मुदतीत प्राप्त होणारी दरपत्रके शक्य झाल्यास दिनांक 07.02.2025 रोजी सकाळी 11.00 वाजता उघडण्यात येतील.
2. **कामाची व्याप्ती** : - अर्थ विभाग जि.प.सातारा येथील कार्यालयीन कामकाजाकरिता आवश्यक अभिलेख वर्गीकरणातील गठ्ठे ठेवण्यासाठी/साठवण करण्याकरिता खालील तपशीलाप्रमाणे लोखंडी शिड्या (Rack) पुरविणे मजुरीसह (GST सह)

| लोखंडी शिड्यांचा तपशील | खरेदी करावयाचे संख्या |
|---|---|
| Heavy duty storage racks, Size - 96 x 36 x 15 inches, 8 shelves with stiffener U D L of 80 kg per shelve, Angle of 40x 40x 2 mm thick, Thickness of shelve-20 SWG, Oven beaked paint finish | 29 |

3. **नियम व अटी :-**
   1) पुरवठाधारकाने त्यांचे मागील 3 वर्षांचे सनदी लेखापाल (CA) यांचे Form-16 / ITR आयकर प्रमाणपत्र सादर करणे आवश्यक आहे.
   2) सुक्ष्म व लघु उद्योग अधिनियम 2006 अतंर्गत नोंदणी असल्यास प्रमाणपत्र सादर करणे आवश्यक आहे.
   3) दुकान गाळे अधिनियम नोंदणीकृत दाखला (दुकान परवाना) सादर करणे आवश्यक आहे.
   4) पुरवठादार/मक्तेदारांचे/संस्थेचे पॅनकार्ड,आधारकार्ड छायांकित प्रत.
   5) दरपत्रकासोबत दुकानाचे/संस्थेचे GSTN Certificate जोडणे आवश्यक आहे.
   6) पुरवठादार यांचे देयकातून प्रचलित नियमानुसार GST व Income Tax यांची देय रकमेतून कपात करण्यात येईल.
   7) पुरवठादार स्थानिक असणे आवश्यक आहे. त्याबाबतचा पुरावा, नांव, मोबाईल क्रमांक ई-मेल इत्यादी माहिती दरपत्रकासोबत जोडण्यात यावी.
   8) पुरवठादार यांनी सदर यंत्रणा बसविल्यानंतर पुरवठा केलेल्या साहित्यांमध्ये मोडतोड झाल्यास सदरील साहित्य विनामुल्य तात्काळ बदलुन अथवा दुरुस्ती करुन देणे पुढील एक वर्ष कालावधीसाठी बंधनकारक आहे.
   9) सदर पुरवठा करण्यात येणारे साहित्य वरील तपशीलाप्रमाणे देणे बंधनकारक राहील व त्यासाठी वापरात येणारे साहित्याचा दर्जा उत्कृष्ट असणे आवश्यक आहे.
   10) सदर कामासाठी वापरण्यात येणारे साहित्यांची वॉरंटी/गॅरंटी कालावधी नमूद करुन अहवाल देण्यात यावा.
   11) पुरवठादार यांना कार्यादेशाच्या तारखेपासून 15 दिवसांत काम पूर्ण करुन देण्याचे आहे व तसा लेखी अहवाल या कार्यालयास सादर करणे आवश्यक आहे.
   12) पुरवठादार यांनी काम दिलेल्या मुदतीत पूर्ण न केल्यास शासन निर्णय दि. 01/12/2016 मधील तरतुदीनुसार देय रकमेतुन दंड कपात करण्यात येईल.
   13) पुरवठादार यांनी संस्थेचे राष्ट्रीयकृत बँक खात्याचे पहिल्या पानाची छायांकित प्रत सोबत जोडावी.

14) पुरवठादार यांनी दरपत्रकासोबत जोडण्यात आलेल्या सर्व कागदपत्रांवर/छायांकित प्रतीवर स्वत:ची स्वाक्षरी करण्याची आहे.
15) पुरवठादार यांनी सदर यंत्रणेसाठी आवश्यक असणारे साहित्य हे स्वखर्चाने आणण्याचे आहे. त्यासाठी वेगळे शुल्क आदा करण्यात येणार नाही.
16) अपूर्ण माहिती, कागदपत्रे असणारे दरपत्रक नाकारण्यात येईल.
17) दरपत्रके स्विकारणे अथवा नाकारण्याचे संपूर्ण अधिकार या कार्यालयाने राखून ठेवण्यात आलेले आहेत. सबब याबाबत कोणत्याही सेवा पुरवठादारास हक्क सांगता येणार नाही.
18) दरपत्रके सादर करताना दरपत्रक सिलबंद लखोट्यामध्ये देण्याचे आहे. सदर लखोट्यावर “गोपनिय-दरपत्रक, कामाचे नांव” नमूद करावे.
19) विहित नमुन्यातील दरपत्रके मा.मुख्य लेखा व वित्त् अधिकारी, दुसरा मजला, जिल्हा परिषद सातारा, सातारा-कोरेगांव रोड, सातारा यांचे नावे दिनांक- 06/02/2025 रोजी सायं.5.00 वाजेपर्यंत या कार्यालयास पोहोच होतील याची दक्षता घ्यावी. विहित मुदतीत प्राप्त न होणाऱ्या दरपत्रकावर कोणत्याही प्रकारची कार्यवाही करण्यात येणार नाही. याबाबत कोणतीही तक्रार विचारात घेण्यात येणार नाही.
20) वरील सर्व अटी व शर्ती मान्य असल्याबाबत संबंधित सेवा पुरवठादार यांनी संस्थेच्या लेटरहेडवर हमीपत्र सही व शिक्याचे देण्याचे आहे.
21) अधिक माहिती व संपर्कासाठी – भाडांर कक्ष, अर्थ विभाग,जिल्हा परिषद सातारा – दूरध्वनी क्र.02162-233832 Email- cafozpsatara@gmail.com
22) दरपत्रक ज्यामध्ये कोणताही तपशील आणि निर्धारित माहिती अपुरी आहे किंवा निर्धारित अटी पूर्ण होत नाहीत, त्या निविदा नाकारण्याचा अधिकार हे कार्यालय राखून ठेवत आहे.
23) मुख्य लेखा व वित्त अधिकारी, जिल्हा परिषद सातारा कोणत्याही कारण न देता सर्व दरपत्रक स्विकारण्याचा किंवा नाकारण्याचा अधिकार राखून ठेवत आहे.

Signed by
Rahul Sampat Kadam
Date: 29-01-2025 18:54:34

(राहुल कदम)
मुख्य लेखा व वित्त अधिकारी
**सातारा जिल्हा परिषद, सातारा**

**प्रत:- कार्यालयालयीन नोटीस बोर्डावर प्रसिध्द करीता**
**प्रत:- सातारा जिल्हा परिषद संकेत स्थळावर प्रसिध्दी करीता**